# महाराष्ट्राच्या ग्रामीण आरोग्य क्षेत्रात बिगर शासकीय संस्थांची भूमिका

**सागरकुमार विठ्ठल जाधव संशोधक विद्यार्थी , राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर**

**प्रस्तावना** भाषावर प्रांत रचनेनुसार १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्र राज्याने सुरूवातीपासूनच कल्याणकारी कल्पनेचा स्विकार केल्याने राज्यातील नागरिकांच्या कल्याणाची सर्वस्वी जबाबदारी शासनसंस्था व तिच्या संलग्न संस्थावर आलेली दिसते. पण १९९१ नंतर भारताने स्विकारलेल्या खुल्या आर्थिक धोरणामुळे भारताला व त्याच अनुशंगाने घटकराज्यानांही आपल्या कल्याणकारी भूमिकेत बदल करावा लागलेला दिसतो. परिणामी शासनव्यवस्थेने आपल्या कल्याणकारी कार्यक्षेत्रातून माघार घेण्यास सुरूवात केली. त्यामुळे या क्षेत्रात निर्वात पोकळी निर्माण झाली आणि त्याच वेळी या निर्वात पोकळीची जागा भरून काढण्यासाठी बिगर शासकीय संस्थांनी राज्याच्या कल्याणकारी कार्यक्षेत्रात आपला सहभाग वाढवलेला दिसतो. या सहभागामुळे बिगर शासकीय संस्थांचे शासकीय योजनांच्या कार्यप्रणालीत महत्त्व वाढल्याचे दिसून येते. या विविध क्षेत्रामधील आरोग्य क्षेत्राचा विस्तार जलद झाल्याचे दिसतो. परिणामी शासनालाही आरोग्य क्षेत्रात बिगर शासकीय संस्थांच्या मदतीची आवश्यकता वाटू लागली. याच आवश्यकतेतूनच बिगर शासकीय संस्थाचा प्रभाव शासनाच्या आरोग्य विभागातील धोरण निर्माण प्रक्रीयेवर दिसून येत आहे.

**बिगर शासकीय संस्था** ः एन.जी.ओ. अर्थात **'नॉन गव्हर्मेंटल ऑर्गनायझेशन'** म्हणजे बिगर शासकीय संस्था. जागतिक बॅंकेने केलेल्या व्याख्येनुसार **'लोकांचे दु:ख कमी करण्यासाठी झटणाऱ्या, गरीबाचे हितरक्षणासाठी व पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी झटणाऱ्या, मूलभूत सामाजिक सेवा पुरवणाऱ्या किंवा सामाजिक विकासाचे कार्य करणाऱ्या खाजगी संस्था म्हणजे बिगर शासकीय संस्था होत'**. तसेच बिगरशासकीय संस्था म्हणजे वैधरित्या स्थापन झालेल्या, शासनापासून अलिप्त राहून कार्य करणाऱ्या आणि सर्व साधारणपणे **' ना नफा ना तोटा'** या तत्वावर सार्वजनिक हितासाठी काम करणाऱ्या संस्था होत. सामाजिक न्याय प्रस्थापित करणे तसेच त्यातून विकास साधणे आणि मानवी हक्कांचे संरक्षण करणे हे बिगर शासकीय संस्थांचे प्राथमिक उध्दिष्ट आहे. सर्व साधारणपणे बिगर शासकीय संस्थांना अंशत: किंवा पूर्णत: शासनाकडून निधी पुरवठा केला जातो आणि शासकीय प्रतिनिधिंना संस्थेबाहेर ठेवून या संस्था आपले बिगर शासकीय स्वरूप राखतात. जागतिक बॅंकेने बिगर शासकीय संस्थेचे कार्यान्वयन आणि सल्लागार स्वरूपातील संस्था असे दोन प्रकारे वर्गीकरण केले आहे. विकास प्रकल्पांची आखणी व अंमलबजावणी हे पहिल्या कार्यान्वयन संस्थेचे उध्दिष्ट आहे तर आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व स्थानिक स्तरावरील धोरण व पध्दतीवर प्रभाव टाकणे हे सल्लागारी प्रकारातील संस्थेचे उध्दिष्ट आहे. या बिगर शासकीय संस्थांचा उदय आंतरराष्ट्रीय स्तरावर १८३९ ला **'रोटरी'** या संस्थेच्या स्थापनेने झालेला आहे. सुरूवातीला जागतिक पातळीवर गुलामगिरी, स्त्री हक्क या विषया संबधीत चळवळीतून विविध बिगर शासकीय संस्थांचा विकास झालेला दिसतो. १९४५ ला संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना झाल्यानंतर बिगर शासकीय संस्थांची संख्या मोठया प्रमाणात वाढलेली दिसते. या बिगर शासकीय संस्था मानवतावादी तत्त्वे, विकास साह्य, पर्यावरण यासारख्या विषयावर जास्त भर देवू लागल्याने यातूनच त्याची व्याप्ती वाढू लागलेली दिसते. जागतिक स्तरावर ॲमनेस्ट इंटरनॅशनल, द एल्डर्स, ग्रीनपीस, डिसएबल पीपल्स इंटरनॅशनल, मेमोरीयल, पाथवेज टू पीस यासारख्या बिगर शासकीय संस्था कार्य करतात.

भारतात आध्यामिक व धार्मिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या देवस्थान संस्थाही सांस्कृतिक, शैक्षणिक व नैसर्गिक आपत्तीच्या वेळी बिगर शासकीय संस्था प्रमाणे कार्यरत राहिलेल्या दिसून येतात. पण एकोणिसाव्या शतकाच्या काळात प्रबोधनातून स्त्रीयांचे हक्क, जातीभेद, शिक्षण, आरोग्य, राजकीय जागृती या सारख्या चळवळ गतिमान झालेल्या दिसतात. या चळवळीनां अनेक समाजसुधारकांचे नेतृत्व मिळाले. त्या अनुशंगाने विविध संस्थाही स्थापन झालेल्या दिसतात. अशा संस्थांच्या संख्येत वाढ होवू लागल्याने परिणामी ब्रिटिश शासनाने १८६० मध्ये सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट पास केला. या ॲक्टनुसार बिगर शासकीय संस्थांना नोंदणी करणे आवश्यक झाले. पुढे १८८२ ला भारतीय विश्वस्त अधिनियम झाला, तसेच स्वतंत्र भारतात १९५६ मध्ये भारतीय कंपनी कायदा झाला. सध्या याच कायदयानुसार बिगरशासकीय संस्थांची नोंदणी भारतात केली जाते. भारतात बिगर शासकीय संस्थाची लोकप्रियता १९ व्या शतकात वाढली असली तरी या संस्था स्वातंत्र्य चळवळीच्या माध्यमातून कार्यरत असलेल्या दिसतात. १९८० नंतर बिगर शासकीय संस्थांच्या कार्यपध्दतीत बदल झाला व त्या विषय प्रधान बनल्या. या बिगर शासकीय संस्था लोकांच्या सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय जीवनावर प्रभाव पाडून विविध कार्यक्षेत्रात कार्य करू लागल्या. भारतातील काही प्रमुख बिगरशासकीय संस्था **-अनहद (२००२), फीडम फर्म (२००६), जस्टीस ऑन ट्रायल , मानव अधिकार संग्राम समिती (११९१), संलाप (१९८७), आवाज फांउडेशन, संकट मोचन फांउडेशन** याच्याबरोबर इतरही बिगर शासकीय संस्था आरोग्य, सामाजिक

विकास, बालविकास, शिक्षण , पर्यावरण या विविध विषया सबंधित कार्य करताना दिसतात. महाराष्ट्रामध्ये शासकीय नोंदणी कृत बिगर शासकीय संस्थांची संख्या ४.८ लाखाच्या जवळपास आहेत त्यातील काही बिगरशासकीय संस्थामध्ये **- हमाल पंचायत** ( बाबा आढाव ), **मुक्तांगण** (डॉ. अनिल अवचट) **वनराई १९८६** (डॉ.मोहन धारिया ), **सेहत , सोपेकॉम, प्रयास , मानव्य , एनकॅस , सर्च, आनंदवन** यासारख्या अनेक बिगर शासकीय संस्था महाराष्ट्रात कार्यरत आहेत.

**आरोग्य क्षेत्रातील बिगर शासकीय संस्थांची भूमिका** ःशासनाला शिक्षण, ऊर्जा, ग्रामीण विकास, आरोग्य, पाणलोटक्षेत्र या प्रकारच्या विविध क्षेत्रात कार्य करत असताना शासन तिच्या संलग्न संस्थांप्रमाणेच बिगर शासकीय संस्थांचीही मदत घ्यावी लागते. जसे १९७० च्या दशकात **एकात्मिक ग्रामीण विकास** कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना जिल्हा परिषद या शासकीय संस्थेप्रमाणेच त्याच्या अंतर्गत बिगर शासकीय संस्थांची स्थापना करून त्याचे साह्य घेण्यात आलले दिसते. आज या बिगर शासकीय संस्था आपल्या परिक्षेत्रात येणाऱ्या राज्यसंस्थेच्या कृतीला पूरक ठरेल असे कार्य करताना दिसतात. तसेच यांचा सहभाग शासनाच्या विविध प्रकल्पातही दिसून येतो. शासन या संस्थांना अनुदानच्या माध्यमातून साहय करताना दिसते. काही बिगर शासकीय संस्था शासनाच्या विविध कार्य क्षेत्रात धोरण ठरवताना सल्लागार म्हणून कार्य करतात. जसे **'सर्च'**ही संस्था आदिवासी संबधी धोरण ठरवताना मार्गदर्शक म्हणून कार्य करताना दिसते. तर **'प्रयास'** संस्था अपारंपारिक खात्याच्या ऊर्जा धोरणात प्रभाव पाडताना दिसते. या सारख्या अनेक बिगर शासकीय संस्था शासनाच्या विविध कार्यक्षेत्रात प्रभाव दाखवतात. आपल्या विचारांचा आग्रह धोरण प्रक्रीयेत धरताना दिसतात. तसेच शासनाने ही यांचे महत्व अधोरेखित केलले दिसते. त्यानुसार शासनही आपल्या जनहिताच्या कार्यपध्दतीत साहाय्यक म्हणून या संस्थांना निधी पुरवताना दिसते. शासनाने ६ व्या पंचवार्षिक योजने पासूनच बिगर शासकीय संस्थांसाठी वेगळया स्तरावर विचार करण्यास सुरूवात केली. तसेच ८ व्या पंचवार्षिक योजने पासूनच वेगळया निधीचीही तरतूद बिगर शासकीय संस्थास करण्यासाठी सुरवात केलेली दिसते. या बिगरशासकीय संस्था आंदोलन, जनजागृती या माध्यमातून शासनाला जनकल्याण विरूध्द कायदे बदलण्यासाठी प्रेरित करतात तसेच अहवाल सादर करणे, माहिती पोहचवणे, सत्य परिस्थितीची जाणीव करून देणे या माध्यमातून शासनाला योग्य कायदे करण्यासाठी मार्गदर्शन करताना दिसतात. या प्रकारे बिगर शासकीय संस्था शासनाच्या धोरण निर्धारण प्रक्रीयेत आपली भूमिका बजावते.या बिगर शासकीय संस्थांच्या भूमिकेचे महत्त्व शासनाच्या विविध क्षेत्रा पैकी आरोग्य क्षेत्रामध्ये वाढलेले दिसते. सार्वजनिक आरोग्य प्रक्रीयेत बिगर शासकीय संस्थांचा प्रवेश झाला असून आरोग्य क्षेत्रात त्यांचा प्रभाव जाणवत आहे. आरोग्य क्षेत्र खाजगी क्षेत्रावर जास्त अवलंबलेले दिसून येते. आज प्रत्येक कुटुंबांचा आरोग्यावर खर्च वाढलेला दिसतो. तसेच आरोग्य क्षेत्रातही सुविधाचा अभाव दिसून येतो, यातच ग्रामीण व शहरी आरोग्य सुविधा मध्ये तफावत दिसून येते. खाजगी दवाखाने महागडी सुविधा पूरवतात तर सार्वजनिक दवाखान्यांची सुविधा स्वस्त असूनही तेथे सुविधांचा अभाव दिसतो. तसेच विविध आरोग्याच्या समस्या सोडवण्यासाठी सरकारी यंत्रणाही अपूरी पडताना दिसून येतात. शासनाला परीवार कल्याण, बालविकास, संसर्गजन्य रोगाचे नियंत्रण, कुष्ठरोग, पोलिओ, क्षय निर्मूलन या प्रकारचे कार्यक्रम राबवताना सरकारी यंत्रेणेची मर्यादा दिसून येवू लागल्याने आणि या क्षेत्रातील सर्व जबाबदारी एकटे पेलण्यास असमर्थ ठरत असल्यानेच शासनाला बिगर शासकीय संस्थाचे साहय आवश्यक वाटू लागले. त्या आवश्यकतेतूनच आरोग्य क्षेत्रात बिगर शासकीय संस्थाचे महत्त्व वाढलेले दिसत आहेत. आज संपूर्ण भारतात ७000 पेक्षा अधिक बिगर शासकीय संस्था आरोग्य क्षेत्रात कार्यरत आहेत.

शासनाला १९६० च्या दशकात आरोग्य क्षेत्रातील योजनाची अमंलबजावणी करताना असे लक्षात आले की आरोग्य क्षेत्रामध्ये बिगर शासकीय संस्था महत्वपूर्ण भूमिका बजावू शकतील यामुळे शासनाने काही प्रमाणात बिगर शासकीय संस्थाचा सहभाग आरोग्य क्षेत्रात करण्यास सुरूवात केली पण या बिगर शासकीय संस्थाचा सहभाग शासनाने व्यवस्थितरित्या करून न घेतल्याने सरकारी धोरणात फसगत होताना दिसते.सरकारी क्षेत्रातील योजना राबवताना शासन फक्त धोरणात्मक निर्णय घेताना दिसते. पण त्याची अमंलबजावणी खालच्या स्तरावर करताना अनेक अडचणी जाणवू लागल्या.पण बिगर शासकीय संस्था पायाभूत स्तरावर कार्य करत होत्या त्यामुळे प्रत्येक क्षेत्रानुसार त्या आरोग्य समस्या निवडून कार्य करत राहील्या.तसेच बिगर शासकीय संस्थांची कार्यपध्दती ही शासनाच्या कार्यपध्दतीपेक्षा वेगळी असते.याचबरोबर आरोग्य क्षेत्रात कार्य करत असलेल्या बिगर शासकीय संस्थांमध्येही सुरवातीला समन्वयाचा अभाव त्यावेळी दिसून येत होता. पण १९७० नंतर भारतात आरोग्य क्षेत्रातील बिगर शासकीय संस्था एकमेकांशी समन्वय साधू लागल्या आणि शासनाने ही याची दखल शासकीय पातळीवर घेतल्यामुळे आरोग्य क्षेत्रातील प्रत्येक कार्यक्रमात बिगर शासकीय संस्थाचे सहकार्य घेण्याच घेण्यास सुरवात झालेली दिसते. परिणामी बिगर शासकीय संस्थांचा शासनाच्या आरोग्य विभागावर प्रभाव वाढला व त्या शासनाला सहकार्य बरोबरच धोरण निर्मितीत सहाय्यक ठरताना दिसू लागल्या. २000 मध्ये **संयुक्त राष्ट्र संघाच्या मिलेनियम डेव्हलपमेंट प्रोग्राम** नुसार भारत सरकार व त्या अनुशंगाने महाराष्ट्रातील शासनाने आरोग्य क्षेत्रामध्ये आरोग्य कार्यक्रम राबवताना दिसतात व या प्रत्येक आरोग्य कार्यक्रमामध्ये बिगर शासकीय संस्थेचा सहभाग दिसून येतो.

यामुळेच शासनाचे मोबाईल मेडीकल युनिट प्रकल्प, एडस नियंत्रण कार्यक्रम, ग्रामिण आरोग्य योजना, परीवार कल्याण, बालविकास, संसर्गजन्य रोगाचे नियंत्रण, कुष्ठरोग, पोलिओ, क्षय निर्मूलन कार्यकम, उपचार शिबीर या विविध योजनेत बिगर शासकीय संस्थांच्या भूमिकेला महत्वपूर्ण स्थान प्राप्त झालले दिसते.

**महाराष्ट्राच्या आरोग्य क्षेत्रात विविध कार्यक्रमात कार्यरत असलेल्या बिगर शासकीय संस्था ः**

१.'विदर्भ महारोगी सेवा मंडळ' अमरावती, 'कुष्ठरोग निवारण समिती' रायगड, 'आंनदग्राम सोसायटी' पुणे , 'गुरपत पूनर्वसन' अहमदनगर 'लोकनायक जयप्रकाश नारायन' वसई, 'हनसोन मेमेरीयल सेसायटी ' वेळू, 'नवनिर्माण समाज सेवा संघ' धुळे, 'महारोगी सेवा समिती' दत्तापूर, 'लोक सेवा संग्राम' मुबंई, 'हिदू कुष्ठ सेव संघ' वडाळा सारख्या बिगर शासकीय संस्था **राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कायक्रमात** सहभागी आहेत .

२.'उसेफ मेहनारी सेंटर तारा' पनवेल, 'हिंद सेवा संघ' ठाणे, 'उज्ज्वल विदया प्रकाशन संस्था' नंदूरबार, 'लायन क्लब' संगमनेर, 'गोदावरी फांउडेशन' जळगाव, 'रूग्ण सेवा मंडल' नांदेड, 'दिशा' गडचिरोली, या बिगर शासकीय संस्था **राष्ट्रीय हिवताप निर्मूलन** कार्यक्रमात सहभागी आहेत .

३.'नवोदय ग्रामीण संस्था' ठाणे, 'गौरी सामाजिक संस्था' नाशिक, 'प्रवुध्द विनायकी कल्याणकारी संस्था' गोंदीया या बिगर शासकीय संस्था **सिकलसेल आजार नियंत्रण** कार्यक्रमाअंतर्गत कार्य करतात.

४.'गोदावरी फाउंडेशन' जळगाव, 'डॉ.डी.वाय पाटील हॉस्पीटल ॲन्ड रिसर्च सेंटर' कोल्हापूर,' सर्च 'नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज' नाशिक, 'मातृसेवा संघ' वर्धा, 'राणी जानकीवाई वैद्यकीय संस्था' सावंतवाडी,'शतायुषी फांउडेशन' माजलगाव यासारख्या बिगर शासकीय संस्था **मोबाईल मेडीकल युनिट** अंतर्गत कार्य करतात.

५.'विदयाकीय संस्था' ठाणे, 'राजीव एडस ट्रस्ट' नंदूरबार, 'रूग्ण सेवा मंडळ' नांदेड या सारख्या बिगर शासकीय संस्था **राष्ट्रीय मेंदूज्वर नियंत्रण** अंतर्गत कार्य करतात याच प्रमाणे महाराष्ट्रात क्षय, एडस, काल आजार, पोलिओ लसीकरण, शालेय आरोग्य तपासणी याप्रकाराच्या शासकीय कार्यकमाशी विविध बिगरशासकीय संस्था कार्यरत असलेल्या दिसतात.

**समारोप** ः भारतात व त्या अनुशंगाने महाराष्ट्रात १९९१ नंतर जागतिकीरणाच्या प्रक्रियेमुळे राज्यसंस्थेच्या कार्यपध्दतीत गुंतागुंत वाढल्याने शासनाच्या कार्याची व्याप्ती वाढल्याचे दिसून येते. यातच शासनाचे आरोग्य क्षेत्र विस्तारत आहे व व्यक्तीच्या जीवनात आरोग्याचे महत्त्व वाढत असल्याने शासनालाही 'व्यक्ति' हा केद्रबिंदू ठेवून सर्व योजनांची आखणी करावी लागते. परिणामी शासनाच्या आरोग्य क्षेत्रात राबवल्या जाणाऱ्या विविध योजनाची व्यापकता वाढलेली दिसते.आरोग्य क्षेत्रात निर्माण होणाऱ्या अनेक समस्या, अडथळे सोडवण्यासाठी आणि शासकीय आरोग्य क्षेत्रातील योजना व धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाला बिगर शासकीय संस्थांचे साह्य महत्वपूर्ण वाटू लागले आहे. यामुळेच शासनाने आपल्या राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमात बिगर शासकीय संस्थांचा समावेश करून घेतलेला दिसतोय. परिणामी बिगर शासकीय संस्थांनीही शासनाच्या आरोग्य क्षेत्रामध्ये आपली व्याप्ती वाढवलेली दिसते .

**संदर्भ सूची ः**

१. भारत की सामाजिक समस्यांए - एन.एन.ओझा , कॉनिकल पब्लिशिंग

२. एनजीओ २०११ - प्रा.रणसुलभे विलास ,

3. The Right to health - Judith Asher – A Resource Manual for NGO , Publish by the Commonwealth medical Trust in August 2004

4. Directory of Tope NGOs –Nabhi Board of Editros,Publish by Nabhi Publicaton 2010.

5. Changing Role of Voluntary Organisation – R.K.Gupata,publish by Sumit Enterprises 2007.